# प्रसिद्ध शिल्पकार अमोल इंगळेची हत्या

## जिल्ह्याभरात हळहळ





**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि. 17 )** - तालुक्यातील आष्टगाव येथील प्रसिद्ध शिल्पकार, देश पातळीवर ख्यातीप्राप्त असलेला शिल्पकार अमोल ताराचंद इंगळे (वय 32) याची हत्या झाल्याची घटना मंगळवार दि.17 ला उघडकीस आली. या घटनेमूळे कला क्षेत्रातील मंडळींसह संपुर्ण जिल्हाभर हळहळ व्यक्त केली जात आहे.

अमोल चे 14 डिसेंबरला अंबाडा येथील एका बारमध्ये समीर शहा नजीर शहा (वय 31, रा. अंबाडा) या युवकाशी भांडण झाले होते. भांडणाचे पर्यवसन मारहाणीत झाले. समीर शहा ने अमोल ला बेदम मारहाण केली. गंभीर जखमी अवस्थेत अमोल ला एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथेच उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. मोर्शी पोलिसांनी आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे. अमोलच्या पश्चात त्याचे वृद्ध आई-वडील आणि पत्नी आहे. त्याच्या जाण्याने कलाविश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### अमोलच्या हातात होती जादु

अमोलच्या हातात नैसर्गिक जादुच होती, जी मुर्तीला जिवंत स्वरूप देत होती.आष्टगाव येथीलच राष्ट्रीय स्तरावर नांव कमाविलेले गजल नवाज भीमराव पांचाळे यांनी अमोलला मदतीचा हात दिला होता. त्याला शिल्पकृती तयार करुन देण्याचे व्यावसायिक स्वरुपाचे पहीले काम मिळवून दिले. परंतू मुंबईत पैसा मिळतो पण स्वत:ची ओळख निर्माण होत नाही, हे पाहता त्यांनी मुंबईवरुन थेट आपल्या जन्मगावी आष्टगावला परत फिरले आणि त्यांनी मोरया आर्टस नावांचे प्रतिष्ठान थाटले होते. अमोल यांनी बनविलेली शिल्पाकृती मुंबई येथील एका प्रसिध्द उद्योग समुहाच्या या कार्यालयात उभारण्यात आली. बडनेरा येथील शिवाजी महाराजांचे शिल्पाकृती, अमरावती येथील एका हॉटेलच्या प्रवेशव्दारावरील शिल्पाकृती, गावातील स्व.सुरेश भट वाचनालय येथे सुप्रसिध्द गजलकार स्व.सुरेश भट यांचे शिल्प याशिवाय अनेकांच्या घरात अमोल यांनी तयार केलेली शिल्पाकृती विराजमान आहे. अमोलच्या पश्चात हे शिल्प फक्त त्याची आठवण करुन देतील. असे त्याच्या चाहत्याचे म्हणणे आहे.

# कापूस जाळून सरकारच्या धोरणांचा निषेध

## रास्त भाव देण्याची शेतकऱ्यांची मागणी ■ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )** - सरकारचे शेतक-यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. निवडणुक काळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सर्वपक्षीय शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत मंगळवारी (दि.17) कापूस जाळून व सोयाबीन, तूर पीक रस्त्यावर फेकून निषेध करण्यात आला.कापसाला दहा हजार, सोयाबीनला सहा हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा व शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी,अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. शेतकरी संघटनांच्या पदाधिकार्यांनी यावेळी शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेधही केला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना मुख्यमंत्र्यांच्या नावे मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, सोयाबीनला सहा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा, नाफेडकडून सोयाबीन खरेदीत आद्रतेची अट शिथिल करावी, शेतमालासाठी भावांतर योजनेची अमंलबजावणी व्हावी यासह प्रामुख्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कापसाला 10 हजार रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात शेतकऱ्यांनी सरकारविरोधात संताप व्यक्त केला. शेतकरी आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठी गर्दी दिसून आली. या आंदोलनात जिल्ह्यातील अनेक शेतकरी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी अनेकवेळा आंदोलने करून त्यांच्या समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी निवेदने दिली आहेत. मात्र प्रशासनाने याकडे लक्ष देत नाही. आता पुन्हा शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी कापूस जाळून, तूर, सोयाबीन रस्त्यावर फेकून रोष व्यक्त केला आणि जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनात पाठविले आहे. या आंदोलनात प्रकाश साबळे, छोटू महाराज वसू, समीर जवंजाळ, चंदू खेडकर, स्वप्नील काटे, संजय कोल्हे, जगदीश बोंडे, अॅड.नंदेश अंबाडकर, काशिनाथ फुटाणे, प्रवीण कोल्हे, अतुल ढोके यांच्यासह शेतकरी संघटना, सर्वपक्षीय शेतकरी समन्वय समिती, किसान संघर्ष समिती अमरावती जिल्ह्यातील पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

> निवडणूक काळात मुख्यमंत्र्यांनी भावांतर योजनेसह कापूस, तुर, सोयाबीनला जो भाव देण्याची घोषणा केली होती त्याची अंमलबजावणी व्हावी. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आज आंदोलन करण्यात आले. भाव नसल्यामुळे सोयाबीन आणि कापूस शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. आद्रतेच्या निकषामुळे नाफेडची खरेदी होत नाही. त्यामुळे आज एक दिवसीय धरणे आंदोलन करून शेतकऱ्यांच्या मनामध्ये असलेला रोष आम्ही व्यक्त केला आहे.
>
> **प्रकाश साबळे, अध्यक्ष**
> **राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघ**



# नायलॉन मांजा विक्रेता पोलिसांच्या ताब्यात

## 36 हजार रुपये किमंतीचा मांजा जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )** - राजापेठ पोलिसांनी रवी नगरातील हनुमान मंदीराजवळ एका इसमाच्या ताब्यातून कृत्रीम लेप लावलेला वेगवेगळा नायलॉन मांजा जप्त केला आहे. सचीन श्रीपाद मोहोड (वय 47 वर्ष, रा. पार्वती नगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 36 हजार रुपये किमंतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. 16 डिसेंबर रोजी सायंकाळी राजापेठ ठाण्यातील डीबी पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, रवी नगरातील हनुमान मंदीरा जवळ एक इसम हा अवैध्दरित्या नायलॉन मांजा विक्रीसाठी घेवुन उभा आहे. या माहीतीवरून पोलिसांनी आरोपी सचीन श्रीपाद मोहोड यांना ताब्यात घेतले. आरोपीच्या ताब्यातून 20 नग मोनो केटीसी फायटर कंपनीचे नायलॉन मांजा चक्कर, 11 नग मोनो केटीसी कंपनीचे नायलॉन मांजा चक्कर, एका लाकडी बेरींग लावलेल्या चक्करवर गुंडाळलेले तिन मोरपंखी रंगाचे नायलॉन मांजा चक्कर, एका लाकडी बेरीग लावलेल्या चक्करवर गुंडाळलेले दोन हिरव्या रंगाचे नायलॉन मांजा , एका लाकडी बेरींग लावलेल्या चक्करवर गुंडाळलेले दोन जांभळ्या रंगाचे व एक केशरी रंगाचे नायलॉन मांजा असे एकुण 31 नग मांजा जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेडडी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, पोलिस उपनिरीक्षक मिलींद हिवरे, पोलिस हवालदार मनीष करपे, पंकज खटे, रवी लीखीतकर, सागर सरदार, पवन तिवारी, पंकज गाठे यांनी केली.

# फायनान्स कंपनीतील युवतीचा विनयभंग

## मॅनेजरसह तिघांविरुध्द गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी ( दि.17 )**- शहरातील संगई प्लॉटमध्ये खडसे बिल्डिंग मध्ये असलेल्या प्रिसीएम ग्रुप फायनान्स सर्विसेस कंपनी मध्ये कार्यरत असलेली 25 वर्षीय युतीचा मॅनेजर, संचालक व कर्मचाऱ्याकडून विनयभंग झाल्याचा गुन्हा दि.16 ला अंजनगाव पोलिसात दाखल झाला आहे.

शहरातील संगई प्लॉट येथील खडसे बिल्डिंग मध्ये असलेल्या प्रिसीयम ग्रुप फायनान्स सर्विस कंपनी चे कार्यालय आहे. या कंपनीत कार्यरत असलेली 25 वर्षीय युवती ही दि.1 डिसेंबर पासून कार्यरत असून दि. 11 डिसेंबरला सकाळी साडे दहा वाजता दरम्यान युवतीने संचालक प्रशांत इंगळे यांना कामानिमित्त फोन केला असता संचालक इंगळे यांनी तुम्हाला जे काही काम असेल ते ऑफिसर वर येऊन सांगा म्हणून तिला बोलाविले. युवती तिच्या स्कुटीने परतवाडा येथून अंजनगाव सुर्जी येथील ऑफिसला आली. युवती ऑफिसला आली तशी संचालकांनी तिला मॅनेजर सोबत एकटीला ऑफिसमध्ये सोडून गेले. युवतीने मॅनेजर शुभम हरणे यांना पेन मागितला असता मॅनेजर शुभम हरणे यांनी युवतीच्या पेन घेत असताना युवतीच्या हाताला वाईट उद्देशाने जाणीवपूर्वक टच केला. त्यामुळे युवतीला वाईट वाटल्यामुळे युवती परतवाडा येथे तिच्या घरी निघून गेली. त्याच दिवशी रात्री 9.30 वाजता दरम्यान युवतीच्या मोबाईलवर मॅनेजरचा मेसेज आला कि 'व्हिडिओ कॉल करू का तुला तू मला सर नको म्हणून तू आम्हाला खुश कर आम्ही तुला खुश ठेवतो' असे मॅनेजरने मेसेज केला. तसेच 12 व 13 डिसेंबर रोजी युवती फिल्ड वर्कवर होती व दि.14 डिसेंबरला युवती ऑफिसला गेली नाही, तर संचालक प्रशांत इंगळे यांनी युवतीला फोन केला व सांगितले की तू मॅनेजरला फोन लाव त्याला सॉरी म्हण त्याची नाराजी दूर कर, तरच तुला जॉब वर ठेवेल, नाहीतर जॉब वरून काढून टाकेल. दुसरीकडे जॉब पण करू देणार नाही. तसेच 16 डिसेंबरला दुपारी साडेबारा वाजता दरम्यान युवती ऑफिसला गेली तेव्हा मॅनेजर शुभम हरणे, ओम लोणकर व संचालक प्रशांत इंगळे हे ऑफिसला हजर होते. प्रशांत इंगळे यांनी युवतीला सांगितले की तू मॅनेजरची माफी मांग, नाही तर टर्मिनेशन लेटर घेऊन घे, व येथून निघून जा, त्यावर युतीने त्यांना म्हटले की, माझ्या क्लाइंट चे पैसे परत करा व माझा पंधरा दिवसाचा पगार द्या, असे म्हटल्यावर ओम लोणकर यांनी तू एकट्यात भेट नंतर तुला सांगतो. अशी धमकी दिली.

Kausalya Shrungare Education Foundation's
**Vidyaniketan College of Pharmacy**
**Anjangaon Surji**
(Approved by PCI, DTE & DBATU)

**ADMISSION NOTICE (B. PHARM.) 2024-25**

Applications are invited from the eligible candidates for the admission to B. Pharm. first year course against the vacant seats (Against CAP quota) after CAP rounds.
Eligibility: As per the norms prescribed by DTE & Government of Maharashtra.

**First Year Bachelor in Pharmacy (B. Pharm.)**

**Admission Schedule 2024-25**

| Sr. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Sale & Receipt of Application Form | 20/12/2024 (5.00 pm) |
| 2 | Display of Provisional Merit list | 21/12/2024 (11.00 am) |
| 3 | Submission of Grievance ( If Any) | 22/12/2024 (3.00 pm) |
| 4 | Display of Final Merit list | 22/12/2024 (5.00 pm) |
| 5 | Admission Confirmation | 23/12/2024 (5.00 pm) |

Principal

Contact
9325884547, 9665811933, 9730246087

# अजगराने गिळली बकरी





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.17 )**- येथील तलाव वनक्षेत्र परिसरातील तालुक्यातील नांदगाव खंडेश्वर येथील हिवरा बुद्रुक, बोपी ह्या गावात अंजनगाव बारीतील सर्पमित्र सुशील मुळे तसेच सहकारी सर्पमित्र अजिंक जिरापुरे, सर्पमित्र नितीन तसरे यांनी एका बकरीची शिकार करणाऱ्या साडेआठ फुट अजगराला पकडून त्याचे रेस्क्यु केले.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.2.
लिंक रोड सदर, नागपुर
दुरध्वनी क्र. 0712-2522498 ई-मेल:-ee.cgeuw.ngp@gmail.com
निविदा सूचना क्रमांक 06 (दुसरी वेळ) सन 2024-25

कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.2, नागपूर, (दुरध्वनी क्र. 0712-2522498) हे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या वतीने खाजगी सुरक्षा अभिकरण नियम 2007 अंतर्गत सुरक्षा अभिकरणाचा व्यवसाय करण्यासाठी अनुज्ञाप्ती परवाना असलेले सक्षम निविदाकारांकडून खालील कामांसाठी ब-1 (टक्केवारी दराने) ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिण/1117/प्र.क्र.104/17 / यांत्रिकी दि. 14.03.2018 अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही.

- कामाचे नाव :- Providing Services of Watchman on contract basis for security of gate parts and other material of Radial Gate of 12 x 6.5m - 7 Nos at Garga Project Dist -Amravati
- जिल्हा :- अमरावती
- निविदेची किंमत रूपये :- रू. 10,06,659/-
- को-या निविदा संचाची किंमत :- रू 2,360/-
- बयाना रक्कम रूपये :- रू 10,100/-
- सुरक्षा रक्कम रूपये :- रू. 20,200/-

- निविदा उपलब्ध कालावधी :- दि. 20/12/2024 (14.00 वाजता पासून) ते 27/12/2024 (18.00 वाजे पर्यंत)
- निविदा सादर करण्याचा कालावधी: दि. 20/12/2024 (14.00 वाजता पासून) ते 27/12/2024 (18.00 वाजे पर्यंत)
- निविदा उघडणे :- दिनांक 30/12/2024 रोजी (14.00 वाजता) शक्य असल्यास किंवा त्यापुढे

**जा.क्र /निविदा/लेशा/2024 दि.**
**कार्यकारी अभियंता यांचं कार्यालय,**
**प्रमुख द्वार उभारणी पथक क्र. 2. लिक रोड सदर नागपूर**

**( ज्ञा. न. मुठाळ )**
**कार्यकारी अभियंता**
**प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.२,**
**नागपूर**

**विमाका/अम./जाही./886**

# पर्यटनाला 'आई' ची चालना

## -कर्जावरील व्याजाची होणार प्रतिपूर्ती ■ योजनेसाठी अमरावती विभागातून 64 अर्ज प्राप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 17 )** - विभागातील पर्यटनाला चालना देण्यासाठी गेल्या वर्षभरा पासून 'आई' ही महिला केंद्रित पर्यटन योजना सुरु करण्यात आली आहे. या याजनेच्या माध्यमातून महिलांना पर्यटन स्थळी व्यवसाय करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या 15 लाखापर्यत कर्जावरील 12 टक्के पर्यतच्या मर्यादित व्याजाचा परतावा उपलब्ध होत आहे. यासाठी अमरावती विभागातून 64 अर्ज आले असून अमरावती मधून 32, यवतमाळ मधून प्रत्येकी 27 असे अर्ज प्राप्त झाले आहेत.अशी माहिती अमरावती विभाग पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक विजय अवधाने यांनी दिली.

गेल्या काही वर्षांत पर्यटनक्षेत्र वेगाने विस्तारत आहे. या क्षेत्रात महिलांना उद्यमशीलतेचे पाठबळ देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने केला जात आहे.

पर्यटनमध्ये महिलांनी व्यवसाय सुरु करण्यासाठी महिलांच्या मालकीचा व त्यांनी चालविणे गरजेचे आहे. टुर आणि ट्रॅव्हल्स एजन्सीमध्ये 50 टक्के महिला कर्मचारी असणे आवश्यक असून पर्यटन क्षेत्राशी निगडित 41 प्रकारचे व्यवसाय महिला करु शकतात. यासाठी पर्यटन विभागाकडून 12 टक्के पर्यतच्या मर्यादित व्याजाचा परतावा उपलब्ध होत आहे. पायाभूत सुविधा, पर्यटनाच्या सुरक्षेला प्राधान्य, महिला उद्योजकता विकास, महिला पर्यटकांसाठी उत्पादने, प्रवास आणि पर्यटन विकास ही 'आई' योजनेतील महिलांसाठीच्या पर्यटन धोरणाची पंचसूत्री आहे. अमरावती विभागात अनेक पर्यटनस्थळे आहेत. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यातील महिलांना व्याज परताव्यासाठी 32 लेटर ऑफ इंटेट निर्गमित केले आहेत. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विभागात एकुण 64 अर्ज आले आहेत.

### कर्ज घेतल्यास त्याच्या व्याजाची प्रतीपूर्ती होणार

महिला केंद्रीत धोरणानुसार महिलांना पर्यटनक्षेत्रामध्ये पर्यटन व्यवसायासाटी कर्ज घेतल्यास त्याच्या व्याजाची प्रतीपूर्ती पर्यटन संचालनालयामार्फत केली जाणार आहे. (व्यवसायाचे नाव होमस्टे, हॉटेल, रेस्टॉरेंट,टुर्स ?न्ड ट्रव्हल कॅराव्हॅन, ई- व्हेहीकल (रिक्षा, मोटर सायकल बस इतर चारचाकी वाहने) साहसी पर्यटन (जमिन, हवा, जल) पर्यटन सुविधा केंद्र, कृषी पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्राजवळील प्रसादाची, खेळणीची दुकाने सोव्हेनियर शॉप इ.) या योजनेचा लाभ घेवू इच्छिनाऱ्या महिलांनी पर्यटन विभागाच्या येथील उपसंचालक कार्यालयाशी या कार्यालयाचा संपर्क दुरध्वनी क्रमांक 0721-2990457 यावर संपर्क करावा, असे आवाहनही अमरावती विभाग पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक विजय अवधाने यांनी केले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तालुक्यात दवामुळे तुर पीकाची होत आहे तुराटी

**हाता तोंडाशी आलेला घास हिरावला ■ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा**



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.17 )**- मागील दोन दिवसांपूर्वी तालुक्यात कडाक्याची थंडी पडली आहे. या थंडीत शेतातील तुरीवर दव पडत असून या दवामुळे तुरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी तर उभ्या तुरी वाळून त्याच्या तुराट्या झाल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. आता शासन व प्रशासन या प्रकाराची दखल घेणार का?, शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणार का? याकडे मात्र बळीराजाचे लक्ष लागले आहे.

दरवर्षी या ना त्या कारणाने शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना सामोरे जावा लागत आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ यामुळे शेतकरी पुरता खचून गेलेला आहे. अशातच शेतातील तुरीवर दव केल्यामुळे तुरीच्या खराट्या झाल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांनी अशा परिस्थितीत करावे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे सततची नापिकी तर दुसरीकडे हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेत असल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. एकीकडे आलेल्या पिकाला भाव नाही, तर दुसरीकडे उत्पन्नात घट झाल्यामुळे लागलेला पैसा निघत नाही, अशी परिस्थिती शेतकऱ्यांची झालेली आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या!



गेल्या अनेक वर्षापासून शेती सतत तोट्यात आहे त्यामुळे शेतकऱ्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. आता तरी शेतीमधून मोठ्या प्रमाणात उत्पन्न होईल व कर्जाचा डोंगर कमी करता येईल या विवंचनेत शेतकरी असताना पुन्हा निसर्गाच्या अवकृपेमुळे दोन दिवसाच्या थंडीमुळे तुरीवर दव जावून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाईसाठी प्रशासनामार्फत पंचनामे करून ताबडतोब मदत करावी अशी मागणी बेनोडा शहीद येथील शेतकरी गोपाल नांदूरकर यांनी केली आहे.

# वीज चोरी : 36 प्रकरणांत 14 लाख रुपयांचा दंड

## महावितरणची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.17 )** - महावितरण विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सिटी 2 उपविभागाने अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरात नोव्हेंबर-डिसेंबर 2024 दरम्यान वीज चोरीविरोधात विशेष मोहिम राबविली. या मोहिमेत 36 प्रकरणांमध्ये वीज चोरीचे प्रकार समोर आले. दोषींवर एकूण 14 लाख रुपयांचा दंड ठोठाविण्यात आला आहे.

या मोहिमेत महावितरण विभागीय कार्यकारी अभियंता रवींद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपूर सिटी 2 उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका बजावली. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीत अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय कुटे, सहायक अभियंता रोहित म्हस्के, अजय चोपडे, नाखले, मुने, आदित्य चिखले आणि पथक सदस्य प्रशांत इंगळे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### वीज चोरी करू नका, नियमित बिल भरा!

अचलपूर महावितरण विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, वीज चोरी करणे हा कायद्याने गुन्हा आहे. पकडले गेल्यास मोठ्या प्रमाणात दंडासह कायदेशीर कारवाई केली जाईल. महावितरण विभागाने पुढे सांगितले की, वीजेचा योग्य वापर करावा आणि कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास तत्काळ वीज विभागाला कळवावे. नियमित वीज बिल भरून महावितरणला सहकार्य करा.

**संजय कुटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता,महावितरण.**

# संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी!

**■भीम सैनिक सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरण■**



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.17 )**- परभणी येथील घटनेत पोलीस कोठडीत आंबेडकरी तरुण कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी संबंधित पोलीस अधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन अचलपूर तालुका काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पुढील संविधान शिल्पाची तोडफोड प्रकरणी स्थानिक कार्यकर्त्यांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदविली. यामुळे पोलिसांनी आंदोलकावर पोलिसांनी अमानुष मारहाण केली. त्यावर समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवित वस्त्यांमध्ये घुसून वाहनाची नासधुस केली. जी पोलिसांनी करणे अपेक्षित नव्हते. त्यासंदर्भातील व्हिडीओ समाज माध्यमावर ही वायरल झाली आहेत. तर काही आंदोलकांना पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले होते. त्यातील एका आंबेडकरी तरुण कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. संविधान प्रतिकृती मोडतोड करणाऱ्या आरोपीची कसून चौकशी करून या घटने मागील खरा सूत्रधार कोण हे शोधावे तसेच सूर्यवंशी यांच्या मृत्युंला जबाबदार पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे तालूका अध्यक्ष काँग्रेस अनु. जाती विभाग राहुल गाठे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. निवेदन देतेवेळी सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, पृथ्वीराज गजभिये, हिरामनजी मेश्राम, योगेश इंगळे, दीपक मोहन, विशाल खानझोडे, प्रमोद बाबर्डे, सुधाकर उमाळे, कैलास डोंगरादिवे, प्रमोद बांबर्डे, संदेश सूर्यवंशी, राजेश सूर्यवंशी, अमोल बोरकर, प्रवीण दाभाडे, विनीत वानखडे, योगेश डांगे, सुनील इंगोले अक्षय पानतावणेसह आंबेडकरी कार्यकर्ते उपस्थित होते.




# जाचक अटींमुळे तालुक्यातील अनेक शेतकरी पीएम योजनेपासून वंचित

**शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.17 )** - निसर्गाच्या लहरीपणामुळे किंवा सोयाबीनला मिळणाऱ्या कमी भावाने अगोदरच त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान योजनेसाठी भरलेले फॉर्म कागदपत्राची पूर्तता न झाल्याने अनेक शेतकऱ्यांचे फॉर्म ना मंजूर करण्यात आले, त्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना राबवल्या जातात, त्यापैकी पीएम किसान योजना आणि किसान सन्मान निधी योजना आहे. पीएम किसान योजनेंतर्गत दिनांक 20/9/2024 पर्यंत तालुका कृषी अधिकारी चांदूर रेल्वे यांना शेतकऱ्यांकडून 2679 फॉर्म प्राप्त झाले होते, त्यापैकी 2060 शेतकऱ्यांचे फॉर्म कागदपत्र पूर्ण न झाल्यामुळे रद्द करण्यात आले, उर्वरित 619 शेतकऱ्यांच्या फॉर्मवर पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रक्रियेसाठी वैध, 3 महिने उलटूनही शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान योजनेचा लाभ मिळू शकला नाही, त्याच तालुक्यातील किसान योजनेच माहिती मिळविण्यासाठी तालुक्यातील शेतकरी आपली कामे धंदे सोडून तालुका कृषी अधिकारी कार्यालयात चकरा मारत आहेत, तर किसान सन्मान निधीची आकडेवारी स्थानिक तालुका कृषी अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याचे येथील अधिकारी चे म्हणणे आहे.

# नागपूर हिवाळी अधिवेशनावर धडकणार मीटर रिडर

**उपोषणाचे अस्त्र उपसणार**



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.17 )** - आपल्या विविध मागण्यांकरिता मीटर रिडर नागपूरात सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनावर धडकणार आहे. इतकेच नव्हे तर ते उपोषणाचे अस्त्र उपसणार आहे.

महाराष्ट्रातील मीटर रिडर हे गेल्या विस वर्षांपासून विद्युत महावितरण मध्ये मीटर रेडींगचे काम करत आहे. पण आता नवीन स्मार्ट मीटरने मीटर रिडरवर उपासमारीची वेळ येत आहे. त्या अनुषंगाने मीटर रिडर युनियनने आपला मोर्चा अधिवेशनकडे वळविला आहे. 19,20, व 21 डिसेंबर 2024 ला दिन दिवस उपोषणाचा पवित्रा घेतला आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातील 20 हजार मीटर रिडर नागपुर हिवाळी अधिवेशनामध्ये धडक मोर्चा काढणार आहे. असे मीटर रीडरचे युनियनचे अध्यक्ष रमेश सांगळे यांनी सांगितले आहे. स्मार्ट मीटरने मुळे विस वर्षांपासून कार्यरत असलेले मीटर रीडर यांच्यावर उपासमारीची वेळ येत आहे. जोपर्यंत मागण्या पुर्ण होत नाहीत, तोपर्यंत आमरण उपोषण ठेवण्याचा मानस मीटर रिडरने घेतला आहे. महाराष्ट्रातील वीस हजार मीटर रीडर बेरोजगार होत आहे. महागाईच्या काळात कुटुंबाचे भार वाढत जात, आहे. मीटर रिडर यांना बेरोजगार न करता त्यांना योग्य काम देण्यात यावा या मागणी करिता शांततेच्या मार्गाने हे आंदोलन करणार असलयाचे याकरिता उपोषण करणार असल्याचे मीटर रिडर युनियनचे अध्यक्ष रमेश सांगळे यांनी सांगितले आहे.

# एनसीसीच्या बटालियन ग्रुपकडून रक्तदान

**अमरावती** - एनसीसीच्या वर्धापनदिनाच्या औचित्याने 8 महाराष्ट्र बटालियन ग्रुप अमरावतीच्या वतीने नुकताच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. वेगवेगळ्या महाविद्यालयातील कॅडेटनी यामध्ये रक्तदान केले. या रक्तदान शिबिरासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. राहुल खराटे, जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे, संगीता गायधने, राखी ढाबरे, मंगेश उमप, प्रवीण कळसकर आदी उपस्थित होते. या रक्तदान शिबिरासाठी 8 महाराष्ट्र बटालियन अमरावतीचे सुभेदार मेजर एस. एन. शेख, सुभेदार मो. झबीर, बी. एच. एम. संतोष भोसले, सी. एच. एम. संतोष शेलार, हवालदार, अशोक राबिया, नायक सुदाम कुशवाहा यांनी परिश्रम घेतले. यात एकूण 40 रक्तदात्यांनी सहभाग घेतला. सहभागी सर्वच रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि डोनर कार्ड जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावतीकडून देण्यात आले.

# कृषी संशोधन केंद्राला मिळाले शेतकरी प्रशिक्षण सभागृह

**2021 मध्ये रोवली होती मुहूर्तमेढ**



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.17 )** - स्थानिक कृषी संशोधन केंद्राला शेतकत्यांना प्रशिक्षण देण्याकरीता सभागृह उपलब्ध झाले आहे. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संचालित सदर संशोधन केंद्राला परतवाडा ते अंजनगाव मार्गावर टुमदार इमारतीचे बांधकाम आणि रंगरंगोटीचे काम पूर्णत्वास गेले आहे. त्यामुळे या इमारतीचे लोकार्पण झाल्यानंतर सदर नवीनतम इमारत शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाकरिता वापरली जाणार आहे. तत्कालीन राज्यमंत्री तथा अकोला चे पालकमंत्री बच्चू कडू यांनी यांच्या हस्ते आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चे कुलगुरू व्ही एम भाले यांच्या प्रमुख उपस्थितीत 2021 मध्ये सदर इमारतीची मुहूर्तमेढ रोवली होती. सदर इमारत आत्ता पूर्ण झाली असून इमारतीच्या पुढील भागाचे काँक्रीटीकरण केले जात आहे. अचलपूर आणि चांदुर बाजार या दोन्ही तालुक्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर असलेल्या संत्राबगा मागील 5 वर्षापासून संकटात आहे. हा संत्रा पट्टा भकास होण्याच्या मार्गावर आहे. बदलत्या तापमानाचा परिणाम विविध पिकांवर आणि उत्पन्नावर होत आहे. त्यामुळे या संशोधन केंद्रातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन भेटले पाहिजे, जेणेकरून भरघोस आणि दर्जेदार उत्पन्न मिळेल, असा सूर उमटत होता. सदर संशोधन केंद्रामध्ये कृषी बाबत संशोधन आणि मार्गदर्शन केले जाते. लिंबू वर्गीय फळे, तेलबिया, भाजीपाला, केळी, धान्य आदी पिकांच्या विविध वाणांवर संशोधन केले जाते आणि सर्व कसोट्यांवर पात्र झालेल्या वाणांच्या बियाण्यांच्या प्रमाणिकरणासाठी पुढील सोपस्कार पूर्ण करून त्याबाबत कार्य केले जाते. अंजनगाव आणि चिखलदरा, धारणी मार्गालगत संशोधनकार्य करण्याकरिता शेकडो एकर मौल्यवान जमीन सदर केंद्राच्या मालकीची आहे. याच इमारतीमध्ये इंग्रजकालीन खुणा आजही कायम असून 150 वर्षे लादलेल्या गुलामगिरीची साक्ष देत आहे. या परिसरात अनेक वर्षानंतर शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी हक्काची वास्तू उभी झाली असल्याने अनेक वर्षे असलेली उणीव या इमारतीमुळे दूर झाली आहे. माजी आ बच्चू कडू यांचा शेतकऱ्यांच्या भरघोस उत्पन्न वाढीसाठी आणि त्यातून आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी असलेला दुरदृष्टीकोन स्पष्ट होत असल्याचे शेतकरी बोलतात.



### जरूड येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव

**जरुड** - स्थानिक संत गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव समितीकडून यावर्षी वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांचा पुण्यतिथी महोत्सव 13 ते 20 डिसेंबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. सदर महोत्सवात विविध कार्यक्रमांची मेजवानी, सामाजिक व धार्मिक उपक्रम, समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात येत आहे. त्यासोबतच 19 डिसेंबरला सायंकाळी 7 वाजता समाज प्रबोधनकार सप्तखंजिरीवादक पवन दवंडे महाराज यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# शेंदूरजनाघाट पोलिसांकडून जबरी चोरीचा गुन्हा उघड



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.17 )** - शेंदुरजना घाट पोलीसांनी जबरी चोरीप्रकरणी दोन चोरट्यांना अटक केली. शेंदूरजना पोलीस स्टेशन अंतर्गत मलकापूर येथील रहिवासी भारती सुनील दुपारे यांच्या घरात घुसून रोजी दोन अनोळखी चोरट्यांनी 28 सप्टेंबर रोजी दुपारी भारती यांना लाकडी काठीने मारहाण करून एक रियलमी कंपनीचा मोबाईल लंपास केला होता. या आशयाच्या तक्रारीवरून शेंदूरजनाघाट पोलिसांनी त्या अज्ञात दोन्ही आरोपी विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले होते. याप्रकरणी कसोशीने तपास करुन पोलिसांनी केला. सोबतच पोलीस स्टेशन सायबरचे मदतीने सदर गुन्ह्याचा तपास हा तांत्रिक पद्धतीने सुद्धा करणे सुरू होते. त्यामध्ये तपास अधिकारी यांनी तांत्रिक पद्धतीने गुन्ह्याचा तपास करून आरोपी गौरव पुरुषोत्तम गजभिये (वय 25 वर्ष रा.अडगाव ता.नेर जि.यवतमाळ ह.मु.निंभोरा, अमरावती) याला ताब्यात घेऊन चौकशी करून गुन्हा उघडकीस आणला. सदरचा गुन्हा कौटुंबिक कलातून झाला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपीचे गुन्ह्यांमधील इतर साथीदार व गेलेल्या मालाचा शोध घेणे सुरू आहे. सदर प्रकरण उघडकीस आणण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर मोर्शी यांचे मार्गदर्शनात ठाणेदार दीपक महाडिक यांच्या नेतृत्वात तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मंगेश शेगोकार पोलीस हेड कॉन्स्टेबल वीरेंद्र अमृतकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप वानखडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर लेवलकर यांच्या पथकाने केली आहे.

# भाजीपाला आवक वाढली, भाव घसरले

**शेतकरी चिंतेत**



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट( दि.17 )** - भाजीपाल्याच्या आवकमध्ये वाढ झाल्याने जवळपास 50 टक्क्यांनी दर घसरले. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये समाधान व्यक्त होत असले, तरी बळीराजा चिंतेत पडला आहे. पुढील महिनाभर दरातील ही घसरण कायम राहणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

ऑक्टोबर अखेरीस परतीच्या पावसाने दणका दिल्यामुळे शेतकर्यांना नुकसानीला सामोरे जावे लागले होते.

गहू, हरभरा, ज्वारी या रब्बी पिकांबरोबर भाजीपाल्याचे नुकसान झाल्याने आवक कमी होऊन भाजीपाला दरात मोठी वाढ झाली होती. मात्र नुकसान होऊनही शेतकर्यांनी धीर न सोडता रब्बी पिके आणि भाजीपाला हंगामावर लक्ष केंद्रित केल्यामुळे डिसेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात भाजीपाला बाजारात आणण्यात बळीराजा यशस्वी झाला. मात्र यामुळे आवक वाढल्याने दरात घसरण बघायला मिळत आहे.

भेंडी, मिरच्या, शेवगा यांच्या भावातही घसरण झाली असून, दोडके, कारले, गवार हे देखील 100 च्या आत आहेत. लसुण, बटाटे आणि कांदे स्थिर असून, कांदे 60, बटाटे 50, लसुन 400 रुपये विक्री होत आहेत. 15 दिवसांपूर्वी 60 ते 70 रुपयांना मिळणारी मेथी 10 वर आली आहे. 80 रुपये विक्री होणारी कोथिंबीर 10 रुपये जुडी विक्री होत आहे.

### भाव उतरल्याने समाधान

थंडीचा हंगाम सुरू होताच गत पंधरवड्यात 150 ते 180 भावाने विक्री होणारा भाजीपाला 50 ते 80 रुपये भावाने विक्री होत असल्याने सर्वसामान्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. फेब्रुवारीपर्यंत आवक सुरूच राहणार असल्याने भाव स्थिर राहणार असल्याची आशा सामान्यजन व्यक्त करीत आहेत.

### शेतकरी चिंतेत

परतीच्या पावसाचा दणका, धुके आणि दव यांमुळे होणारे नुकसान सहन करून शेतमालाचे रक्षण करीत बळीराजाने भाजीपाला बाजारात आणला. मात्र आवक वाढल्याने दरात घसरण झाली. यामुळे नुकसान होत असून, शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे. अस्मानी संकटाबरोबरच सुलतानी संकटांचा सामना करीत असताना शेतमालाच्या भावानेही दगा दिल्याने शेतकरी वर्गात नाराजी दिसून येत आहे. भाजीपाला दरात 50 टक्क्यांनी घसरण झाल्याने सामान्यांमध्ये समाधान आहे. महागाई भडकलेली असताना दुसरीकडे भाजीपाला दरात घसरण झाल्याने गृहिणी समाधान व्यक्त करीत आहेत. मकर संक्रांतीपर्यंत दरातील घसरण कायम राहील असे भाजीविक्रेते सांगतात.